शांतपणे विचार करून घेतलेले निर्णय नेहमी योग्य ठरतात.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | रविवार १६ मार्च २०२५ | अंक ९६ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# करुणा शर्मा यांची धनंजय मुंडेबाबत मोठी भविष्यवाणी; म्हणाल्या, येत्या सहा महिन्यात.....?



**पीआयएल दाखल करेन**

**यावेळी त्यांनी माणिकराव कोकाटे यांच्या प्रकरणावरही भाष्य केलं. लोकांच्या पैश्यांचा गैरवापर केला जात आहे. लोकांचे पैसे जात आहेत. अशा भ्रष्ट लोकांना मंत्रालयात बसवलं तर लोकांना काय न्याय मिळणार? त्यामुळे हे लोक सत्तेतून गेले पाहिजे. माझ्या पक्षाच्या माध्यमातून मी पीआयएल फाईल करणार आहे, असंही त्यांनी सांगितलं.**

करुणा शर्मा यांनी माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या विरोधात केलेल्या तक्रारीवर आज सुनावणी झाली. या सुनावणीपूर्वीच करुणा शर्मा यांनी धनंजय मुंडे यांच्यावर तोफ डागली आहे. तसेच मुंडे यांच्याबाबत मोठी भविष्यवाणी केली आहे. येत्या सहा महिन्यात धनंजय मुंडे यांची आमदारकीही जाईल, असं भाकीतच करुणा शर्मा यांनी केलं आहे. मी मागे त्यांचं मंत्रिपद जाणार असं म्हटलं होतं, ते खरं झालंय, असंही त्यांनी यावेळी सांगितलं. करुणा शर्मा यांनी मीडियाशी संवाद साधला. यावेळी त्या बोलत होत्या. धनंजय मुंडे यांनी निवडणुकीत २०० बुथ कॅप्चर केले होते. हे सर्वांना माहीत आहे. निवडणुकीत शपथपत्रात त्यांनी माझं नाव टाकलं नव्हतं. आमच्या केसचा संदर्भही दिला नव्हता. २०१४ पासून त्यांनी माझं आणि माझ्या मुलाबाळांचं नाव टाकलं नाही. धक्कादायक म्हणजे निवडणूक अधिकारी आणि जिल्हाधिका-यांनीही त्यावर काही आक्षेप घेतला नाही, असं करुणा शर्मा म्हणाल्या.

## कराडचे घर का नाही तोडले?

खोक्याचे घर तोडण्यात आलं. त्यावरही त्यांनी भाष्य केलं. कुणाचं घर कधी तोडू नये आणि जाळूही नये. कोणाचेही घर तोडण्याचा, जाळण्याचा अधिकार नाही. तुम्हाला घरं तोडायची आणि जाळायचीच असेल तर मंत्री, आमदारांची तोडा. हे लोक तरुणांना गुंड प्रवृत्तीकडे नेत आहेत, असं सांगतानाच वाल्मिक कराडचे घर का नाही तोडले? असा सवाल त्यांनी केला आहे. बीड ची परिस्थिती बिकट होती. पण आता एसपी साहेबांनी ती आटोक्यात आणली पाहिजे. खोक्याचा घर तोडले. आता वाल्मीक कराड आणि आमदार, मंत्र्यांचे घरही तोडायला पाहिजे, अशी मागणीही त्यानी केली.

## वॉरंट निघेल

याच प्रकरणावर माझी लढाई सुरू आहे. आता त्याचे वॉरंट निघेल. त्यांना सहा महिन्यांची शिक्षा होईल. धनंजय मुंडेंना जावं लागेल. धनंजय मुंडेंचं मंत्रीपद जाणार हे मी जसं बोलले होते, तसंच सांगते की येत्या सहा महिन्यात त्यांची आमदारकी जाईल, असा दावाही करुणा यांनी केला.

# संतोष देशमुख हत्येतील सर्व आरोपींनी फाशी द्या, तोपर्यंत एकही सण साजरा न करण्याचा ग्रामस्थांचा निर्धार

## संतापाचा उद्रेक उडाला

**संतोष देशमुख यांच्या मृतदेहांची अक्षरशः विटंबना करतानाचे फोटो काढण्यात आले होते. हा फोटो व्हायलर करण्यात आले. त्यामुळे संतापाचा उद्रेक उडाला. या प्रकरणात फास्ट ट्रॅक कोर्टात खटला उभारला गेला आहे. या प्रकरणात सरकारी वकील म्हणून ॲड. उज्ज्वल निकम यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. या प्रकरणात मस्साजोगमध्ये यंदा होळी आणि धुळवड साजरी न करण्याचा निर्णय ग्रामस्थानी घेतला आहे. इतकेच या पुढे जोपपर्यंत सर्व आरोपींना फाशी होत नाही तर मस्साजोगमध्ये कोणताच सण साजरा न करण्याची शपथ ग्रामस्थांनी घेतली आहे.**





बीड येथील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची गेल्यावर्षी दहा डिसेंबर रोजी अपहरणानंतर हत्या करण्यात आली होती. या निर्घृण हत्येनंतर राज्यभरात खळबळ उडाली होती. या हत्याकांडानंतर महाराष्ट्राची वाट आता बिहार आणि उत्तर प्रदेशच्या दिशेने होऊ लागली आहे. आता मस्साजोग ग्रामस्थांनी यंदाचा होळी सण साजरा केला नाही. जोपर्यंत संतोष देशमुख यांच्या हत्याकांडातील सर्व आरोपींना फाशी होत नाही तोपर्यंत कोणताही सण साजरा करणार नाही असा निर्धार ग्रामस्थांनी केला आहे. बीड येथील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांनी १० डिसेंबर २०२४ रोजी हत्या करण्यात आल्याने खळबळ उडाली होती. या हत्याकांडाची सुई मंत्री धनंजय मुंडे यांचे अत्यंत जवळचे कार्यकर्ते वाल्मीक कराड यांच्या दिशेने वळली होती. त्यानंतर या प्रकरणात ९ ते १० आरोपींना अटक करण्यात आली होती. वाल्मीक कराड या प्रकरणात पुणे सीआयडीच्या कार्यालयात हजर झाला. त्यानंतर या सर्व आरोपींना मोक्का लावण्यात आला. या प्रकरणात सुरुवातीपासूनच मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी होत होती. अखर अर्थ संकल्पीय अधिवेशनाच्या तोंडावर संतोष देशमुख यांच्या हत्येचे आठ व्हिडीओ आणि १५ फोटो व्हायरल झाल्याने खळबळ उडाली. या फोटोत ही हत्या किची निर्घृण आणि क्रुरतेच्या सर्व मर्यादा ओलांडणारी असल्याचे उघड झाल्याने खळबळ उडाली. त्यामुळे मंत्री धनंजय मुंडे यांना अखेर आपल्या मंत्री पदाचा राजीनामा द्यावा लागला.

## श्री मंगलनाथ मल्टीस्टेटच्या वतीने महिला दिनानिमित्त मिसेस उपक्रमाचे आयोजन




माजलगाव-प्रतिनिधी माजलगाव शहरांमध्ये महिला दिनानिमित्त माजलगाव मिसेस हा प्रथमच एक अनोखा उपक्रम दिनांक १६ मार्च २०२५ रोजी ईगलवूड इंग्लिश स्कूल फुले पिंपळगाव, माजलगाव येथे आयोजित करण्यात आलेला आहे. स्त्री म्हणजे त्याग, प्रेम, कणखरपणा आणि प्रेरणा आहे तिचा गुणगौरव व्हावा, व त्यांच्या अंगी असलेले कला कौशल्य गुण व्यक्तिमत्व सादर करणे करिता एक मंच निर्माण व्हावा करिता या अनोख्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवून विजयी होणाऱ्या स्पर्धकास पैठणी साडीसह गृह उपयोगी वस्तू चा संच त्याचबरोबर विविध आकर्षक पारितोषिके प्राप्त होणार आहेत. तरी रोटरी क्लब माजलगाव सिटी चे विद्यमान अध्यक्ष तथा श्री मंगलनाथ मल्टीस्टेट चे व्यवस्थापकीय संचालक ॲड.रवींद्र कानडे, व ईगलवूड इंग्लिश स्कूल माजलगावच्या अध्यक्षा व उपक्रम प्रमुख सौ.अर्चना पवार यांनी माजलगाव शहर व परिसरातील जास्तीत जास्त महिलांनी सहभाग नोंदवून या अनोख्या उपक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन करण्यात आले आहे.

# खोक्या भोसलेच्या घरावर वनविभागाने फिरवला बुलडोझर वनविभागाची मोठी कारवाई

बीड/प्रतिनिधी:- खोक्या उर्फ सतीश भोसलेच्या शिरूर कासार गावात असलेल्या घरावर बुलडोझर फिरवण्यात आला आहे. वन विभागाच्या जागेवर हे अनधिकृतपणे घर बांधण्यात आलं होतं. त्यामुळे आता वनविभागाने ही कारवाई केली आहे. या आधी वनविभाने नोटिस पाठवली होती. पण 48 तासांमध्ये कोणतंही उत्तर न आल्यामुळे ही कारवाई करण्यात आली. खोक्या उर्फ सतीश भोसले हा भाजपचे आमदार सुरेश धस यांचा कार्यकर्ता आहे. खोक्या भोसलेला प्रयागराजमधून बीड पोलिसांनी ताब्यात घेतलं असून त्याला बीडमध्ये आणलं जात आहे. त्याचवेळी वनविभागाने त्याच्या घरावर कारवाई केली आहे.खोक्या भोसले याच्यावर मारहाणीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर त्याच्या घरावर वनविभागाने धाड टाकली होती. त्यावेळी धारदार शस्त्रं, जाळी, वाघूरीसह आणि अनेक गोष्टी वनविभागाला आढळून आल्या. प्राण्यांचे मांस देखील पोलिसांना आढळले.खोक्याने शेकडो वन्य जीव, हरिण, काळवीट, ससे आणि मोरांची शिकार केली असल्याचा गंभीर आरोप वन्यजीवप्रेमींनी केला आहे. तसेच, हरणांच्या पार्ट्या केल्याचे अवशेषही सापडत असल्याचा दावा त्यांनी केला. बीडच्या शिरूर तालुक्यातील बावी या गावातील डोंगर परिसरामध्ये मोठा हरणांचा कळप आहे, आणि या कळपाला संपवण्याचे काम सतीश उर्फ खोक्या भोसले आणि त्याच्या गँगने केले आहे. बावी गावातील ढाकणे यांच्या शेतीलगत असलेला डोंगर, या डोंगरांमध्ये हरण पाणी पिण्यासाठी आणि चारा खाण्यासाठी येत होते. मात्र, त्याच हरणांना पकडण्यासाठी त्यांची शिकार करण्यासाठी सतीश भोसले आणि त्याची गँग जाळी लावत होती.सतीश भोसले हा मागील पाच वर्षापासून राजकारणात सक्रिय असून तो शिरूर कासार तालुक्यातील झापेवाडीचा रहिवासी आहे. त्याच्याकडे भाजपच्या महाराष्ट्र भटके विमुक्त आघाडीचे पद आहे. आधीही सतीश भोसलेवर गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती मिळत आहे. अलीकडच्या काळात सुरेश धस यांच्याशी संपर्क आल्याने जवळीक वाढली. सुरेश धस यांचा कार्यकर्ता असल्याची ओळख निर्माण झाल्याने परिसरात दबदबा निर्माण झाला आहे.वन्य प्राण्यांना मारणे, त्यांची शिकार करणे हे कायद्याने गुन्हा आहे असं कोणी करत असेल तर शिकार करणाऱ्या लोकांवरती कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली जात आहे

# गेवराई तहसीलमध्ये पुरवठा विभागाचा अनागोंदी कारभार.

## आंधळ दळतंय कुत्र पीठ खातंय.असा कारभार पुरवठा विभागाचा.मा. जिल्हाधिकारी साहेब लक्ष देतील का?

चकलांबा-प्रतीनीधी-:(सय्यद असलम) दि.१४ मार्च -गेवराई तालुक्यातील राशन दुकानात एकुन खात्यापैकी ६०%खाते असे आहेत की त्यांना धान्य नाही आणि येणारे पैशाचा लाभ सुद्धा नाही.

गेवराई तहसील मध्ये पुरवठा विभागात अनागोंदी कारभार आहे. पैसे दिल्यास अझङ मध्ये नाव घेता येते. आणि तसेच, ज्यांना शेती नाही अशा गरजुवंतला धान्य मिळत नाही, तर यालाच म्हणतात मआंधळ दळतंय आणि कुत्र पीठ खातंयफ या म्हणी प्रमाने गेवराई पुरवठा विभागाचा कारभार सुरू आहे.

गेवराई तालुक्यातील चकलंबा येथील मजुरी करणारा नजीर जब्बार सय्यद या मजुराचे गेवराई तहसील पुरवठा विभागात मागील दोन वर्षापासून तीन ते चार वेळेस कागद पत्र देऊन काहीच उपयोग झाला नाही. विचारणा केली असता तुमचं होइल असे उत्तर मिळते. तसेच, राशन दुकानात गेला असता तिथे त्याला राशन दुकानदारकडून तुमचं नाव वरून आल नाही,असे सांगण्यत येते. मग त्या मजुराला शेती नाही . आणि राशन दुकानातुन धान्य ही मिळत नाही.मग त्या मजुराने करायचे काय ? एकीकडे सरकार गरिबांसाठी नवनवीन योजना काढत आहे. या गेवराई तालुक्यात गरिबांसाठी योजना नाही का ? मग या योजना कोणासाठी?तर ही योजना श्रीमंताला गरीब दाखवुन दिली जात आहे. हा प्रकार पुर्ण तालुक्यात दिसुन येत आहे. तरी,गेवराई तालुक्यातील जनतेला मा. जिल्हाधिकारी साहेब न्याय देतील का ? ही चर्चा तालुक्यात सुरू आहे. असले तरी यामध्ये बीड पोलिसांपेक्षा उत्तर प्रदेशच्या पोलिसांचे योगदान अधिक असल्याची चर्चा रंगली आहे. खोक्याला सकाळी प्रयागराज पोलिसांच्या ताब्या ठेवण्यात आले होते. त्यानंतर बीड पोलिसांची पथक खोक्याला घेऊन बीडच्या दिशेने रवाना झाले आहे. सतीश भोसलेला घेऊन पोलीस आज रात्री किंवा उद्या सकाळी पोलीस ठाण्यात पोहोचतील, अशी शक्यता आहे.



# आक्रोश मोर्चाच्या नावाखाली पैसे जमा करणारा विशाळ माझाच

## अखेर सुरेश धस यांची कबुली

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर आरोपींना अटक करण्याच्या मागणीसाठी राज्यभरात आक्रोश मोर्चे काढण्यात आले होते. यावेळी आशिष विशाळ हे नाव चर्चेत आले होते. या व्यक्तीने संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांना मदत करायची असल्याचे सांगून अनेक अधिकाऱ्यांकडून पैसे घेतल्याचा आरोप मराठा आंदोलकांनी केला होता. त्यामुळे मराठा कार्यकर्त्यांनी त्याला बेदम चोप दिला होता. हा आशिष विशाळ माझा सहकारी आहे, अशी कबुली आमदार सुरेश धस यांनी अखेर दिली आहे.आधी म्हटले होते माझा संबंध नाहीः संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांना मदत करायची म्हणून आक्रोश मोर्चाच्या नावाखाली धाराशिवमधील आशिष विशाळ पैसे गोळा करत होता. तो माझाच सहकारी असल्याची कबुली आमदार सुरेश धस यांनी दिली आहे. काही दिवसांपूर्वी या आशिष विशाळ याला मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांच्या समर्थकांकडून मारहाण करण्यात आली होती. त्याने धाराशिव शहरात खंडणी उकळल्याचा प्रकार समोर आला होता. त्यावेळी आमदार सुरेश धस यांनी माझा त्याच्याशी कोणताही संबंध नसल्याचे सांगत ङ्गयाला आणखी तुडवा,ङ्ग असे भाष्य केले होते आता दिली कबुली आशिष विशाळ हा आपलाच सहकारी असल्याचे आमदार सुरेश धस यांनी मान्य केले आहे. तो नेमका कुणाच्या सांगण्यावरून खंडणी गोळा करत होता? तसेच त्याच्याकडे दोन कोटी रुपयांची एफडी आणि १८ लाखांची कार आली कुठून? हा प्रश्न आहे. आशिष विसाळ हा आमदार सुरेश धस यांचा पीए असल्याचे सांगत सरकारी अधिका-यांना धमकावत होता. त्यांच्याकडून खंडणी जमा करत होता. धाराशिवचे तत्कालीन जिल्हाधिकारी प्रवीण गेडाम यांचा फोटो डीपीला ठेवून तो पैसे गोळा करत असल्याचा आरोप त्याच्यावर करण्यात आला होता.

# संपादकीय

## वाईट गोष्टी होळीत दहन करा

आपलेपणा कसा निर्माण होईल यासाठी प्रयत्न केला आहे.आपल्या धर्म शास्त्रानुसार आपण अनेक सण उत्सव साजरे करतो. प्रत्येक सण उत्सवाच महत्व वेगवेगळ आहे. होळी हा परिवर्तनाचा उत्सव आहे. अंहकार दुर्गुणांची होळी करून सद्‌गुणाचा स्वीकार गरजेचं आहे. निसर्ग सुद्धा हे परिवर्तन स्वीकारून पानगळीच्या नंतर नवचैतन्य पालवी निर्माण करत सुखद धक्का देतो तो हाच कालावधी आहे. आपल्या संस्कृती नुसार देशाच्या वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या पद्धतीने साजरा होणारा शिमगा हा उत्सव पौराणिक परंपरेनुसार होलिका दहन करण्याचा उत्सव असला तरी त्यातली मुळ मुख्य भाव हाच आहे. कि आपल्या जीवनातील आळस, नकारात्मकता चिंता, निरुत्साह, दुःख, तणाव, द्वेष, राग, अंहकार, याची होळी करा. दुःख मुक्त व्हा चिंता मुक्त व्हा एक नवीन सुरुवात म्हणून स्वतः मध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात सकारात्मक उर्जा निर्माण करा म्हणजे रंग उधळत चैतन्य निर्माण करा. सर्व दुर्गण होलिकेत अर्पण करा. आणि ह्या बाबी आपल्या जीवतातुन दुःख काढून टाका आपोआप नवचैतन्य निर्माण होऊन आपल्या जीवनात एक वेगळं परिवर्तन होईल याच परिवर्तनाचे साक्षीदार होण्याचा हा भव्य उत्सव म्हणजे होळी. निसर्गाच परिवर्तन या नियमानुसार कडाक्याची थंडी संपुष्टात येऊन जीवाची लाही करणा-या उन्हाळ्याची चाहूल देत निसर्ग आपलं रूपड बदलतो. बदलत्या निसर्गाच्या रूपाचे मानवी जीवनाच्या अनुषंगाने अनेक दृष्ट्या महत्व आहे. निसर्ग ज्या पद्धतीने स्वतः उन्हाळा हिवाळा पावसाळा याचा सुयोग्य मेळ घालतो आणि आपलं कार्य पूर्ण करतो त्याच पद्धतीच्या मानवाने देखील आपल्या जीवनातील सुख दुःखांचा मेळ घालत आयुष्य पुढे नेताना निसर्गाकडून काही तरी शिकण्याची गरज आहे. आयुष्यातील दुःखांचा ओझ किती काळ डोक्यावर घेऊन मनुष्य फिरू शकतो त्याला पण एक मर्यादा असते. म्हणून निसर्गाने आपल्या सुंदर रचनेत अनेक आकर्षक बाबी निर्माण केल्या आहेत. त्याच वेळोवेळी आपल्या रूप दर्शन घडतं. जसे जसे उन्हाचा तडाखा निर्माण होऊन सगळीकडे लाहीलाही होण्याची सुरुवात होते. निसर्गातील सगळी हिरवळ संपुष्टात येऊन सगळीकडे फक्त मनात उदासीनताच निर्माण होईल असं रूक्ष वातावरण दिसत. आणि याच भायनाक वातावरणात सगळ्याच झाडांची पानगळ सुरुवात होऊन नवं पालवी फुटु लागते. आणि नेमकं याच वेळी पळस या झाडाला एकही पान शिल्लक नसताना देखील पळस स्वतः नवचैतन्याच प्रतिक होत परिवर्तनाचा शिलेदार होतो. अगदी निसर्गाला आव्हान देत उभा असतो. तुझ्या दहकतेमुळे माझी पान जरी नष्ट झाली तरी माझी इच्छा शक्ती नष्ट झाली नाही. मी पुन्हा उभा राहतोय पान नसताना देखील फुलांना जन्म घालतोय हा नवा संकल्प घेऊन पळस निसर्गाच्या कुशीत प्रचंड प्रमाणात लाल रंगाच्या फुलांनसह सगळ्यांचं लक्ष आपल्या कडे आकर्षित करतो. या फुलांच्या घडामुळे हा डोंगर माथा सपाटा प्रदेश अगदी सगळीकडे एक चैतन्य निर्माण होते. आणि कड कह अशा उन्हाळ्याची चाहूल लागली असताना देखिल एकटा पळस निसगाँच्या सौंदर्यात भर घालत नवचैतन्य निमर्ण करतो. दहक अशा उन्हाळ्याची जाणीव होऊ देत नाही. त्याच पद्धतीने आपल्या जीवनातील आळस, दुःख, चिंता, तणाव याच दहन करून नवचैतन्याची होळी साजरी करण्याच पर्व म्हणजे शिमगा. निसर्गातील बहुतांश झाडांची पानगळ झालेली असताना देखिल नवीन पालवी फुटते म्हणजे नवचैतन्य निर्माण होतं. तसंच मानवी जीवन आहे अनेक वेगवेगळ्या पद्धतीचे दुःख कुठेतरी नष्ट करून पुन्हा नव्या उमेदीने कामाला सुरुवात करण्याच पर्व म्हणजे शिमगा होळी उत्सव असून कडकडीत उन्हात सुद्धा झाड जीवन जगण्याची गोडी अजिबात कमी होऊ देत नाहीत. हिच बाब मनुष्याला निसर्गाकडून शिकणं आवश्यक आहे. आणि आपल्या जीवनात आत्मसात करत सुख दुःखांचा मेळ घालत नवचैतन्य निर्माण करण्याची आवश्यकता आहे. आणि हाच शुभारंभ उत्सव महोत्सव म्हणजे होळी. निसर्गातील परिवर्तनाचे माध्यम असणारा पळस त्याचा तो बहर आणि त्याच पळसाची फुले त्या फुलांचा प्रेरणादायी रंग लेवुन आपण आनंदी जीवनाची सुरुवात करतो. महणून दुःख संपुष्टात आणल पाहिजे ते विसरलं पाहिजे व नवचैतन्य निर्माण असा आनंद जीवनात

# आठवणीतील होळी

माझं मराठीच
मोठपण
सांगतात सारे सण
राहू इथं एकोप्यान ,
ठेवू धर्माची जाण
देऊ थोरांसी मान
घेऊ ध्यानात
शिकवण .

खरंय आपल्या भारतीय सणांची परंपरा आपल्याला खूप काही शिकवते. आपल्या या सणांचे निसर्गाशी खूप जवळचे नाते आहे. प्रत्येक ऋतूंशी त्यांचे ऋणानुबंध आहे.शिशिराची पानगळ संपून झाडांना नवीन पालवी फुटू लागली की वसंत ऋतूची चाहूल लागते.कोकिळेचे मंजुळ स्वर कानी येऊ लागतात आणि आपसूकच होळीची आठवण येते. होळी हा सण जसा आनंद साजरा करण्याचा तसाच तो दुष्ट आणि वाईट प्रवृत्तीचे निर्दालन करण्याचा आहे. या होळीशी निगडीत अनेक कथा आहेत. विविध प्रांत त्यांच्या प्रथेप्रमाणे होळी साजरी करतात. होळी शक्यतो प्रदोष काळी पेटवली जाते. त्या मागची आख्यायिक अशी की ,हिरण्यकश्यपू नावाचा राजा होता. तो स्वतःला देवांपेक्षा सर्वश्रेष्ठ मानायचा. पण त्याचा मुलगा प्रल्हाद हा मात्र प्रचंड विष्णुभक्त होता. हिरण्यकश्यपूने प्रल्हादला त्याच्या भक्तीपासून परावृत्त करायचा बराच प्रयत्न केला. पण त्याला काही यश आले नाही. त्याला खूप राग आला आणि त्याने आपली बहीण होलिका हीला बोलावले. त्याने तिला अग्नीत प्रवेश करून प्रल्हादला मांडीवर घेऊन बसायला सांगितले. होलीकेला अग्नी जाळू शकणार नाही असा वर होता हे हिरण्यकश्यपूला माहीत होते,त्यामुळे होलिकेला काही होणार नाही पण प्रल्हाद मात्र जळून खाक होईल अशी पक्की खात्री होती. पण झाले उलटेच. म्हणतात ना की देव तारी त्याला कोण मारी. विष्णूच्या परम भक्तीमुळे प्रल्हादच्या केसालाही धक्का लागला नाही पण होलीका मात्र जळून भस्म झाली. या कथेतून आपल्याला वाईटवर चांगल्याचा विजय होतो हाच संकेत मिळतो. ही घटना घडली त्या दिवशी फाल्गुन पौर्णिमा होती म्हणूनच या दिवसाला होळी पौर्णिमा,हुताशनी पौर्णिमा असे म्हणतात. सर्वांनी एकत्र यायचे आणि बेभान होऊन होळी साजरी करायची .

होळीशी संदर्भीत आणखी एक आख्यायिका प्रचलीत आहे ती अशी की ढुंढा नावाची एक राक्षसीण होती. ती लहान मुलांना खूप त्रास द्यायची. मुले खूप घाबरायची तीला. त्यामुळे त्रस्त अशा त्यांच्या पालकांनी तीला हाकलून द्यायचा प्रयत्न केला पण काहीच उपयोग झाला नाही. एक दिवस सूर्यास्ताच्या वेळी गावातील सर्व पुरुष एकत्र जमले. येतानाच प्रत्येकांनी आपआपल्या घरून पाच पाच लाकडे,गोव-्या आणल्या होत्या. एक खड्डा खणून त्यात मधोमध ती लाकडे व गोव-्या रचल्या आणि त्याला विस्तव लावून पेटवून दिले. आग भडकू लागली. समस्त गावक-्यांनी त्या अग्निभोवती फे-या मारत ढुंढा राक्षसीणीच्या नावाने बोंबा मारू लागले. हा सर्व प्रकार त्या राक्षसीणीने पहिला . तीला वाटले की आता हे सर्व गावकरी आपल्याला पकडून त्या आगीत ढकलतील. ती खूप घाबरली आणि दूर दूर पळून गेली. गावातून अमंगल निघून गेली म्हणून प्रत्येकाने घरी पुरणपोळीचा स्वयंपाक केला. पुरणपोळी घेतली त्यावर कुरडई,पापड्या सोबत भात आमटी घालून होळीची मनोभावे पूजा करून त्या पवित्र अग्नीला नैवेद्य अर्पण केला. हीच परंपरा पुढे चालू राहिली. फक्त होळीची लाकडे रचताना सर्वात प्रथम मधोमध एरंडेच्या झाडाची फांदी त्या ढुंढा राक्षसणीचे प्रतीक म्हणून उभे करतात. ब-याच ठिकाणी होळीच्या सभोवती सुंदर रांगोळी घालतात. त्या होळीला साडी नेसवतात. त्या एरंडेच्या झाडाला ओटी बांधतात. साडीचोळीचा मान करणे ही आपली संस्कृती आहे ना. मग मनोभावे पूजा करून होलिकायै नमः म्हणून होळी पेटवतात.
अस्तपाभयसंत्रस्तै कृत्वा तं
होलि बाहलशैः
अतस्ता पुजयिष्यामी भुते भुतिप्रदा भवः
असा मंत्र बोलत प्रदक्षिणा घालून होळीला नारळ अर्पण करतात .

परंतु आजकालच्या धकाधकीच्या जीवनामुळे सणांचे रूपच पालटून गेले. बदल ही काळाची गरज आहे असे म्हणतात. मनुष्याची विचारसरणी बदलली . आपली नैसर्गीक संपत्ती असलेल्या वृक्षांची कत्तल करून होळीत जाळल्या जाणा-्या लाकडांमुळे पर्यावरणाचा -हास होऊ लागला . यासाठी पर्यावरणप्रेमींकडून अनेक उपक्रम राबवले जातात. नुकतीच शिशिराची पानगळ झालेली असते. सर्वत्र पालापाचोळा ,सुक्या काटक्या इतरत्र पडलेले असतात. ती सर्व गोळा करून त्याची होळी करावी. असे केल्याने पर्यावरणाचे रक्षणही करता येईल आणि आपला परिसरही स्वच्छ ठेवता येईल. परिसर स्वच्छ ठेवणे हे आरोग्याच्या दृष्टीने खूप महत्वाचे आहे. स्वच्छता नसेल तर रोगराई वाढेल आणि ती ढुंढा राक्षसीण त्या रोगराईच्या रूपात वावरत असते. तीचा नायनाट करण्यासाठी स्वच्छता पाळणे फार गरजेचे आहे.
होळीची एक अशी आठवण माझ्या मनातून गेलेली नाही . काय झाले की त्या वर्षी आम्ही होळीसाठी गावी गेलो होतो सर्वजण आनंदाने होळी साजरी करत होते. होळीने चांगलाच पेट घेतला होता,आगीच्या ज्वाळा उंच भडकत होत्या. सर्वजण आनंदात असताना अचानक काय झाले काही कळले नाही. कोणीतरी त्या होळीच्या आगीत पडल्यासारखे जाणवले. नंतर कळले की कोणी पडले न्हवते तर ती सुमन होती. तीने स्वतः हून आगीत उडी मारली. गरीबाघरची गुणी पोर ती. अहो तीचे लग्न होऊन एक वर्षही झाले न्हवते. सर्वांनी प्रयत्न करून तिला कसेबसे बाहेर काढले. बरीच भाजली होती. बघवत न्हवते तिच्याकडे. तपासाअंती कळले की लग्न झाल्यापासून तिच्या गरीब बापाने हुंडा दिला नाही म्हणून तिचा नवरा आणि सासुसासरे दररोज तिचा अमानुष छळ करत होते. तीच जीण नकोसे करून टाकले होते. खूपच हृदयद्रावक घटना होती ती. तो दिवस आठवला की आजही काळजात धस्स होते.

म्हणूनच वाटते की होळीत दहन करायचे ते अमानुष हुंडापद्धतील, दहशतवादाला ,भ्रष्टाचाराला, जात पात मानणा-्या रुढीला,व्यसनी आणि वासनेच्या आहारी गेलेल्या नराधमांना . त्याचप्रमाणे निराशा, दारिद्र्य, अहंकार,कुविचार यांचेही दहन व्हायला पाहिजे. होळीचा मुख्य उद्देश हा वाईटचा नाश आणि एका नव्या विचारांची सुरवात. होळीचा दुसरा दिवस धुळवड. काहीजण त्याला रंगपंचमी म्हणतात. बच्चे कंपनीचा तर आवडीचा सण. पालकांनी त्यांना योग्य ते मार्गदर्शन केले पाहिजे. रंगपंचमी साजरा करताना सामाजीकतेचे भान ठेवले पाहिजे. डोळ्यांना आणि त्वचेला इजा पोहचवणा-या रासायनीक रंगांचा वापर न करता नैसर्गीक रंगांचा वापर केला पाहिजे. काही ठिकाणी दुष्काळाचे सावट आहे. लोकांना प्यायला सुद्धा पाणी मिळत नाही . बरेच ठिकाणी आठ दिवसांनी किंवा पंधरा दिवसांनी पाणी येते. तेव्हा आपणही कोरड्या रंगांनी रंगपंचमी साजरी करून पाणी वाचवले पाहिजे. अशा सर्व छोट्या छोट्या गोष्टींचे पालन केले तर आनंदाच्या सणाला गालबोट लागणार नाही. आता बहुतेक ठिकाणी इकोफ्रेंडली होळी साजरी करतात.

आणि आनंदाने गाणे म्हणतात
खेळताना रंग बाई होळीचा

होळी रे होळी,होळी रे होळी,
नैराश्य अहंकाराची जाळूया मोळी ,
झाडे लावू,झाडे जगवू,पर्यावरण सांभाळी,
वसंतऋतूंच्या आगमने साजरा करूया होळी .

सौ.अनिता नरेंद्र गुजर
अभामसाप डोंबिवली अध्यक्षा
८०९७५२४१९७

# देणं

चैत्रात मोहरून जाणारा आंबा त्या भोवती पिंगा घालण-या मधमाशा , वैशाख वनव्यात फुलणारा पळस , गुलमोहर डोळ्यांना शांतता देतील व पाखरांनाही वेड लावतील .
पिवळाजर्द बहावा ज्येष्ठाच्या उन्हाळ्यात फुलून येईल. पाणगळीतील समाधीस्थ वृक्ष तुमच्या जीवनात रंग भरेल. हा सारा निसर्गाचा खेळ थोड्याशा सौंदर्यदृष्टीने आपणच मांडू शकतो घराभोवती जागा सदाहरीत आपण ठेवू शकतो. जीवनात घेण्यापेक्षा देण्यातच खूप काही आहे . कुंपणाच्या जागा कोणीही हिरवं ठेवू शकत .पण कुंपणाच्या पलीकडे रस्ता हिरवा करणे म्हणजे सामाजिक वृक्षारोपण होय. मग हेच वृक्ष अनोळखी वाटसरुंची वाट सदाहरित करतील . आसरा देतील सावली देतील दुस-यांना देण्याचा गुणधर्म अंगी घ्यायचा असेल तर झाडांकडे पहा आणि शिका झाडे लावा झाडांना जीव लावा झाडे आपणाला काय म्हणून देत नाहीत. सारे तर तेच देतात . झाडेच आपली मायबाप बंधू सखा मित्र गुरु सारे काही आहेत . म्हणून मला तरी झाडे फार फार आवडतात
झाड इतकी आवडतात की
झाडासाठी जीव सुद्धा देईन
जगाची या बाग फुलवण्या
जन्म मी पुन्हा पुन्हा घेईन

सौ सुवर्णा तावरे विटा

# कांदिवली येथे जगद्गुरू श्री संत तुकाराम बीजोत्सवाचे आयोजन.

भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम..कांदिवली पश्चिम मध्ये जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज बीजोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याचे कांदिवली पश्चिम येथील ज्ञानोबा तुकाराम वारकरी सांप्रदायिक भजन मंडळ (वासकर फड) यांनी पत्रकाद्वारे आमचे मुंबई प्रतिनिधी भारत कवितके यांना कळिवले आहे.सालाबादप्रमाणे या वर्षी ही कांदिवली पश्चिम येथील वांझा वाडी,मथुरादास रोड, चव्हाण हायस्कूल जवळ, कांदिवली पश्चिम या ठिकाणी दिनांक १४ मार्च २०२५ ते दिनांक १६ मार्च २०२५ पर्यंत गुरुवर्य वै.ह.भ.प.आप्पासाहेब वासकर महाराज प्रणीत गुरुवर्य वै.ह.भ
प.विवेकानंद आप्पासाहेब वासकर (दादा) महाराज यांच्या कृपा आशिर्वादाने जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज बीजोत्सव गुरुवर्य हे.भ.प.कौस्तुक विवेकानंद महाराज ( राऊ मालक) , गुरुवर्य हे.भ.प.देवव्रत विवेकानंद वासकर ( राणू मालक) वासकर फड यांच्या नेतृत्वाखाली जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज बीजोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे,संत ज्ञानेश्वर महाराज,संत नामदेव महाराज ,संत एकनाथ महाराज, संत निळोबाराय यांनी निवेदन करुन ठेवलेल्या परंपरेनुसार बीजोत्सव निमित्त मंचरी पारायण, प्रवचन, कीर्तन,हरिजागर इत्यादी कार्यक्रम होणार आहेत, दैनंदिन कार्यक्रमासह दिनांक १४ मार्च २०२५ ते १६ मार्च २०२५ पर्यंत दररोज पहाटे ४ते ६ काकड आरती,७ते १२ आणि दुपारी २ ते ४ पर्यंत मंचरी पारायण व दुपारी ४ते ५ हरिपाठ, आणि दिनांक १६ मार्च २०२५ रोजी सकाळी १० ते १२ बीजे निमित्त ह.भ.प.यशवंतबुवा मधुकर पाटील ( ठाणे) यांचे काल्याचे कीर्तन असे कार्यक्रम होतील,तर बीजोत्सव निमित्त ११ वाजता महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे, कीर्तनास साथ गायक ह.भप.संदिप सकपाळ,मृदुंगमणी हे.भ.प.दिलीप कुचेकर,हे.भ.प.रविंद्र तावडे,हे.भ.प.नंदकुमार वरळीकर,हे.भ.प.निवृत्ती तावडे यांचा सहभाग असणार आहे,तरी कार्यक्रमाला भाविकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहावे असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# आईचे हळवे मन.

... आई..... आ-आत्मा ई-ईश्वर.. ईश्वराचा आत्मा जिथे निवास करतो ती आई. नऊ महिने उदरात वाढवते ती आई. अनेक यातनातून मूलं जन्माला घालते ती आई. लहानपणात जपते ती आई. सुसंस्कार लावते ती आई. स्वतः कष्ट करून मुलांना सुखी करते ती आई. जेवणापासून शाळेत जाईपर्यंत सारे शिकवते ती आई. आजारपणात उशाशी बसून काळजी घेते ती आई. चुकल्यावर हातात छडी घेवून शिस्त लावते ती आई. काय आणि किती आठवणी हो आईच्या ... आई हृदयातले मखर त्या मखरात तिचे अढळ स्थान ते कोणीही हिरावू शकत नाही. मुलगा काय किंवा मुलगी काय यांच्या संस्काराचा उत्तम पाया ही माऊलीच तर आहे. सुखदुःखात साथ देणारी माय आपण कितीही मोठे होऊ दे,पण घरी आल्यावर डोक्यावरून तिचा फिरणारा हात,तो स्पर्श काय कसा गेला आजचा दिवस?हा तिचा प्रश्न...क्षणात दिवसभराचा शिण घालवतो. आपले लग्न होते .मुली संसारात रमतात.मुलांची जबाबदारी वाढते. माऊलीला जरा आता एकट वाटायला लागत. मुलीच्या पाठी संसारात तिला काही अडचणी आल्या तर खंबीरपणे उभी राहते. मुलाच्या संसारात रममाण होते. पण आलेली सूनबाई जर लेकीप्रमाणेच वागली तर प्रश्नच येत नाहीत.आणि सासू झालेल्या आईनेही आपले विचार जरा बदलावेत. मग त्या आईच्या मुलाचा,मुलीचा संसार सुखाचा होईल. आई ही आईच असते. तिची सर कुणालाच नसते सर्वांच्या सुखातच ती सुखी असते लाडात वाढलेली ती पण एक कन्या तर असते... आई हा विषय खूप मोठा आहे . मी साधारणच लिहिलेय. आता जरा मनातलं लिहिते.. आईचे मन हळवे कसे?? मुलगी सासरला गेली आहे. तिला काही त्रास तर होत नसेल ना! या विचाराने मन पोखरून जाते. पण मुलीच्या संसारात कधीही ढवळाढवळ करायची नसते. कारण ज्याच्या हाती आपण सोपवले आहे तो सक्षम आहे हेच बघून आपण मुलीचा हात त्याच्यात दिलेला असतो. हा पण ज्या वेळी मुलीला आपली गरज आहे त्यावेळी मात्र तिच्या पाठीशी आपण खंबीरपणे उभ राहिल पाहिजे. मुलीला मुलं होतात. ती आपली नातवंड खेळवण्यासाठी जीव खूप धडपडतो. पण कितीही केलं तरी ती जावयाची मुलं असतात. आपल्या घरी थोडा वेळ येतील आणि जातील. पण अशावेळी आजीचं नातं खूप वेगळं असतं. म्हणतात ना दुधावरची साय खूप छान असते. तशी ही मुला मुलींची मुलं हे खूप प्रिय असतात. आईचे हळवे मन नातवंडांकडे खूप ओढ घ्यायला लागते. भेटायला कोणी आलं नाही तर मन अस्वस्थ होते. मग पर्स उचलायची, खाऊ घ्यायचा आणि आपण तिच्या घरी जाऊन मुलांना भेटून यायचे. असे हे आपले हळवे मन. मुलगा परदेशी शिकायला आहे. आता तिथे नोकरीलाही लागलेला आहे. अशावेळी त्याची रोज आठवण येते. आता तर काय लग्न करून परत तिथेच स्थायिक झाला मुलगा.. यावेळी घरामध्ये काही अडचण आली, आजारपणं आली तर अशावेळी आवर्जून आठवण येते. कारण आता या हाताला बाकीची काम करायची सवय राहिलेली नसते. काम करण्याची क्षमता कमी झालेली असते. मग काय कोणावर तरी अवलंबून राहावे लागते. मग एकांतात या मुलांच्या आठवणी काढत हळूवार डोळ्यातून पाणी गालावर ओघळत असते. आपल्या ह्या अश्रूंचा कोणालाही त्रास नको. न नवऱ्याला ना कुटुंबाला ना मुलांना... असे हे आईचे हळवे मन. जमले तर सर्व मुलांनी आईच्या या मनाला जपावे. तिची काळजी घ्यावी. जरी दूर देशी राहत असाल तरी रोज एक फोन करावा. मुलींनी सुद्धा आपल्या मायेसाठी आपण फोन करावा. आता तर व्हिडिओ कॉल उपलब्ध आहेत. माणूस समोरासमोर दिसत आहे. त्याचे हावभाव समजत आहेत. मग अशावेळी कॉल केला नाही तर आईच्या मनाला काय दुःख होत असेल याचा विचार मुलांनी करावा. आणि जी मुलं जवळ आहेत. त्यांनी आपल्या आई-वडिलांना टाकून बोलू नये. त्यांनीच लहानपणापासून तुम्हाला सांभाळलेले असते. काही चुका होतात वृद्धांच्या हातून. ती चूक छान शब्दात समजून सांगावी. त्यांना अपशब्द वापरू नयेत. या अप शब्दांनी मनावर इतका घात होतो की त्यांचे पुढील आयुष्याची उभारी संपते. त्यासाठी देवाने दिलेल्या तोंडाचा आपण वापर योग्य तो करावा. अपशब्द कोणालाच वापरू नयेत. काही कारणास्तव शब्द तोंडातून गेला तर सॉरी म्हणून तात्काळ तो विषय मिटवावा. आई-वडिलांना काय हवे असते हो वेगळं! फक्त तुम्ही त्यांची रोज चौकशी करा. जेवलात का हे विचारा. बरे आहात ना हे विचारा. नातवंडांबरोबर खेळू द्यात. मग बघा हेच वृद्ध तुम्हालाही आवडतील आणि वृद्धांना तुम्ही आवडाल..... ते तुमचे परके नसून आपले आहेत हाच विचार मनात ठेवावा... आईचे हळवे मन जपलेत तर पुढे तुमचे मन जपणारे अनेक लोक समाजात मिळतील. कुटुंबात मिळतील. तुमची मुलं तुम्हाला छान सांभाळतील. हे सर्व अनुभवाचे बोल आहेत. जसे आपण वागतो तसे आपल्याकडे वाढून ठेवलेले असते. हे म्हण खोटी नाही खरी आहे. एवढे एक वाक्य लिहिते आणि संपवते.... लेकीच्या माहेरासाठी माय सासरी नांदते
वसुधा नाईक,पुणे मो. नं. ९८२३५८२११६

# बाल मनाला आनंद देणारा काव्यसंग्रह : चला गाऊ गाणी

पुस्तकाचे नाव - चला गाऊ गाणी
कवी - मनिषा मालुसरे
प्रकाशक - परिस पब्लिकेशन, पुणे.
प्रकाशन वर्ष - ५ सप्टेंबर २०२४
पृष्ठे - ६४
वाड्मय प्रकार- कवितासंग्रह
मूल्य - १५० रु.
मुखपृष्ठ- - गिरीपर्ण
समीक्षक - सचिन बेंडभर.

बाल मनाला आनंद देणारा काव्यसंग्रह : चला गाऊ गाणी

प्रसिद्ध कवयित्री मनिषा मालुसरे यांचा चला गाऊ गाणी हा काव्यसंग्रह नुकताच प्रकाशित झाला आहे. खरंतर त्यांच्या लहान मुलांच्या विषयाला अनुसरून असलेल्या त्यांच्या कविता बालमनाला भुरळ घालतात. इतक्या त्या सहज आणि सुंदर रचलेल्या आहेत. अगदी त्या मुलांनाच नव्हे तर थोरामोठ्यांनाही ठेका धरायला भाग पाडतात, अशा लयीत त्या तयार झालेल्या आहेत.

कवयित्री मालुसरे यांचे आजपर्यंत शाळांमध्ये अनेक कार्यक्रम झालेले आहेत. यात त्यांनी विद्यार्थ्यांना काव्य निर्मितीची प्रेरणा देऊन त्यांच्यासाठी तयार केलेल्या कवितांचे गायन केले आहे. त्या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद तर लाभलाच शिवाय शिक्षकांनीही त्या कार्यक्रमांचे कौतुक केले व त्यांना काव्यसंग्रह करण्याचा आग्रह केला. त्या आग्रहास्तव त्यांनी चला गाऊ गाणी हा काव्यसंग्रह तुमच्यापुढे आणला आहे त्याचे महाराष्ट्र भरातून कौतुक होत आहे.

मुळातच शिक्षकी पेशात वावरत असताना कवयित्री मालुसरे यांना लहान मुलांचा आवाका माहित आहे. त्यांचे भावविश्व त्यांना ज्ञात असल्याने त्यांना वाचनाची आवड निर्माण करून काव्य निर्मितीसाठी प्रेरित करण्याचे कार्य त्यांनी केले आहे, ही बाब दखल घेण्यासारखी निश्चितच आहे.

यात गणपती, उंदीर, बेडूक, फुले, फुगा आणि बाहुली असे मुलांच्या भावविश्वातील हलकेफुलके विषय घेऊन त्यावर कविता केलेल्या आहेत. तर काही कविता विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमावर देखील तयार केलेल्या आहेत. मनोरंजनातून ज्ञान देण्याचा त्यांचा हा अनोखा प्रयत्न भलताच यशस्वी झाला आहे. त्यामुळे लहान मुलांनाच नवे तर मोठ्यांना देखील हा काव्यसंग्रह आवडेल अशी खात्री आहे.

गणपती बाप्पा या पहिल्याच कवितेने या काव्यसंग्रहाची सुरुवात होते. अत्यंत लयीत आणि ठिक्यात असलेली ही कविता वाचताना मुले देहदान विसरून जातात. अत्यंत साधी सोपी भाषा, सुंदर वर्णन शैली आणि कवितेचा ठेका यामुळे कविता अधिकच खुलून दिसते. मुले आनंदाने ती गातात आणि तिच्या तालात नाचतात. शेवटी सर्वांवर तुझी कृपादृष्टी असू दे अशी बाप्पाकडे केलेली मागणी मुलांना जगण्याचा व्यापक दृष्टिकोन शिकवते.

उंदीर मामा या कवितेत छोट्याशा उंदराचे वर्णन कवीने अतिशय सुंदररित्या केले आहे. ती त्यात म्हणते,
उंदीर मामा उंदीर मामा
इवले विले तुमचे कान
एवढेसे शरीर जरी
तुरुतुरु चालता छान
अगदी लहान मुलांना रुचेल पचेल आणि आवडेल अशाच शब्दात कवयित्रीने या कवितांची निर्मिती केली आहे. लहान मुली त्यात गुंग होऊन जातात. इतके की ते भानही विसरतात इतक्या या कविता लहान मुलांशी समरस होत आहेत. उंदीर मामा या गोड कवितेचा शेवट करताना कवयित्री म्हणते,
उंदीर मामा उंदीर मामा
गणपती बाप्पांचे वाहन छान
बाप्पांच्या पायापाशी
मिळतो मात्र तुम्हास मान

मुलांच्या जीवनाशी निगडित अगदी छोटी छोटी विषय घेऊन त्यांच्या आवडीच्या कविता कवयित्रीने अत्यंत खुबीने बनवलेल्या आहेत. त्यात कोणताही उवापोह केला नाही. की अलंकारिक शब्दांचा मारा केला नाही. अगदीच सहज सोप्या भाषेत त्या मुलांच्या पुढे सादर झालेल्या आहेत.

सर्वच कविता वाचनीय असून त्यांची मांडणी कवयित्रीने मुलांचा वयोगटाचा विचार करून तयार केली आहे. मुलांची आवड लक्षात घेऊन या कविता त्या अनुषंगाने बनवलेल्या आहेत. या कवितांतून मनोरंजन तर होते पण नकळतपणे मुलांना ज्ञान सुद्धा प्राप्त होते. त्यामुळे या कविता विद्यार्थ्यांना हव्या हव्याशा वाटतात. त्या त्यांना आपल्याशा वाटतात.

अकरा ते वीस अंक वाचन या कवितेत कवयित्रीने अंकांची ओळख करून देत या कवितेची सुंदर मांडणी केली आहे. यातून मनोरंजन तर होतेच शिवाय विद्यार्थ्यांना आनंददायी शिक्षण पण मिळते. अगदी हसत खेळत नकळतपणे विद्यार्थी अभ्यास करतात. गाणी म्हटल्याप्रमाणे ते या कवितांचे वाचन करत असल्यामुळे त्यांना अंक ओळख सुद्धा सहजपणे होऊन जाते. या कवितेत त्या म्हणतात,
एक दशक एक, अकरा
बाहुलीचा मोठा नखरा

एक दशक दोन, बारा
इंद्रधनुष्याचा थाट न्यारा

अशा प्रकारे मालुसरे यांनी विद्यार्थ्यांना अंकांची ओळख करून देत कवितेच्या माध्यमातून त्यांचे मनोरंजन केले आहे. या सुंदर कवितेचा शेवट करताना त्या म्हणतात,
दोन दशक वीस
वा-याने डोले मोराचे पीस

अशाप्रकारे मनोरंजक कविता बरोबरच शैक्षणिक कविता घेऊन कवयित्रीने मुलांना नकळतपणे ज्ञान देण्याचा प्रयत्न केला आहे. ज्यात कुठेही आपल्याला कृत्रिमता जाणवत नाही. कोणताही मानसिक ताण न देता कवयित्रीने दिलेले हे ज्ञान बालसाहित्याच्या जगात दुर्लक्ष करण्याइतके निश्चितच नाही.

पुणे येथील नावाजलेल्या परिस पब्लिकेशनने या पुस्तकाची साजेशी बांधणी केली आहे. पुस्तकाची गुणवत्ता आणि पानांचा दर्जा त्यांनी केलेल्या मेहनतीची साक्ष देतो. प्रसिद्ध चित्रकार गिरीपर्ण, यांनी विषयाला अनुरूप काढलेले आकर्षक मुखपृष्ठ व आतील प्रसंगाला अनुरूप काढलेली साजेशी चित्रे पुस्तकाच्या उंचीत मोलाची भर टाकतात. मनिषा मालुसरे यांना पुढील साहित्यिक वाटचालीसाठी मनापासून हार्दिक शुभेच्छा..!

# दादा खिंडकर वाल्मिक कराडपेक्षाही मोठा गुन्हेगार, तीन गावे दहशतीमध्ये-परमेश्वर सातपुते




बीड। प्रतिनिधीः-
धनंजय देशमुख यांचा दादा खिंडकर याने तरुणाला अमानुष मारहाण केल्याच्या व्हिडिओ व्हायरल झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. दादा खिंडकर याच्यावर पिंपळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर आज दादा खिंडकर पोलीस अधीक्षक कार्यालयात पोलिसांना शरण आला. दादा खिंडकर याला पिंपळनेर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. दादा खिंडकरला अटक केल्यानंतर ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी खिंडकर याच्यावर गंभीर आरोप केले आहेत. खिंडकर याने सातपुते यांच्या घरावर हल्ला चढवत त्यांच्या गाडीची तोडफोड केली होती. या प्रकरणात त्याच्यावर गुन्हा देखील दाखल आहे.दादा खिंडकर याच्यावर घरफोडी जीवे मारण्याचा प्रयत्न करणे, असे गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्याच्या दहशतीखाली ग्रामपंचायत अंतर्गत तीन गावे आहेत. तो वाल्मीक कराड पेक्षाही मोठा गुन्हेगार आहे. त्यामुळे त्याच्यावर मोकोका अंतर्गत कारवाई करून अटक करावी, अशी मागणी सातपुते यांनी केली आहे. तर दादा खिंडकर हा माजी आमदार अमरसिंह पंडित आणि विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांच्या गटाचा आहे. अमरसिंह पंडित यांनीच त्याची पाठराखण केली. त्यामुळे अमरसिंह पंडित हाच खिंडकरचा अका असल्याचा गंभीर आरोप सातपुते यांनी केला.दादा खिंडकर याचा एक जूना व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता. त्यात ओमकार सातपुते याला खिंडकर मारहाण करत असल्याचे दिसते. या व्हिडिओतून अमानुष पद्धतीने मारहाण केल्याचे समोर आले. ओमकार सातपुते हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांचा चुलत भाऊ आहे. खिंडकर याच्यावर पिंपळनेर पोलीस ठाण्यात रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला. यानंतर त्याच्या शोधासाठी पोलिसांनी पथक रवाना केले होते.

# चालत्या गाडीमधून बीडच्या तरुणाने मित्रालाच दिले फेकून

पुणेः मद्यधुंद अवस्थेत असताना गाडी चालवायला दे, असे म्हणत मालकालाच चालत्या गाडीतून फेकून दिल्याचा प्रकार इंदापूर तालुक्यातील निरगुडे येथे घडला. तसेच सदर गाडी अडवताना काही जण गंभीर जखमी झाले असून तीन व्यक्ती गाडी घेऊन फरार झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील कड या गावताली चार व्यक्ती बारामती येथे पोलिसांनी पकडलेले वाहन सोडवण्यासाठी चारचाकी गाडी घेऊन आले होते. मात्र पोलिसांनी वाहन सोडले नाही. त्यानंतर बारामतीमध्ये मद्यप्राशन करून हे चौघे भवानीनगर येथे नातेवाईकांना भेटण्यासाठी जाणार होते. गाडीचा मालक सुद्धा मद्यधुंद अवस्थे होता. यावेळी गाडीतील एका व्यक्तीने गाडी मला चालवायला दे, अस म्हणच चक्क गाडी मालकालाचा गाडीतून बाहेर फेकून दिले. त्यानंतर गाडीच्या मालकाने सदर ठिकाणी उपस्थित असलेल्या कंपनीच्या कामगारांना घडलेला प्रकार सांगितला. त्यानंतर त्यांनी दुचाकीवरुन गाडीचा पाठलाग केला, परंतु दुचाकीवरच गाडी घातल्याने दुचाकीवरील तिघे गंभीर जखमी झाले आहेत. तर मद्यधुंद अवस्थेत गाडी घेऊन सदर व्यक्ती या भिगवनच्या दिशेने गेल्या आहेत. भवानी नगरच्या नातेवाईकांना कळल्यानंतर हे धावत त्या ठिकाणी गेले व जखमी झालेल्या मुलांना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले.

# डॉ.अभिषेक भगवानराव सिरसाट बीडीएस प्रथम श्रेणीत उत्तीर्ण

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड-लोहा : तालुक्यातील उमरा येथील या छोट्याशा गावातील शेतकरी कुटुंबात वाढलेल्या तरुणानं डॉक्टर बनत (बीडीएस डेंटल) ची पदवी मिळवत मोठं यश मिळवलंय भगवान तेजेराव सिरसाट यांचा मुलगा डॉ.अभिषेक भगवान सिरसाट यानं हा लौकिक मिळवला. शेतकरी कुटुंबात जन्म, वडील शेतकरी अशा परिस्थितीतही मेहनत, जिद्द आणि चिकाटीनं सर्वावर मात करत अभिषेक न स्वतःला सिद्ध केलं.ध्यास, धडपड, सातत्य, प्रामाणिकपणा, कौशल्य, बुद्धिमत्ता, कठोर मेहनत, जिद्द आणि प्रचंड इच्छाशक्ती यांच्या जोरावर माणूस यशाच्या शिखरावर विराजमान होतो. सामान्य शेतक-याच्या मुलानं हे करून दाखवलं आहे.या मुलाचं नाव आहे डॉ.अभिषेक भगवानराव सिरसाट नांदेड जिल्ह्यातील लोहा तालुक्यातील उमरा या खेड्यातून येत तो डॉक्टर बनला.अभिषेक च प्राथमिक शिक्षण गावात जिल्हा परिषद शाळेत तर माध्यमिक पदवीपर्यंतच शिक्षण



नांदेड येथे आणि वैद्यकीय शिक्षण डॉ.हेंडगेवार स्मृती रुग्ण सेवा मंडळ डेंटल कॉलेज हिंगोली इथं झालं.एका सर्वसामान्य शेतक-याच्या मुलानं जिद्द व परिश्रमाने बीडीएस ची पदवी घेत प्रथम श्रेणीत परीक्षा उत्तीर्ण होऊन डॉक्टर होण्याचा मान मिळवला आहे.अभिषेकने बीडीएस ही पदवी संपादन केली.अगदी जिद्दीनं परिश्रमानं कष्टाने सामान्य परिस्थितीतून जात त्यानं शिक्षण पूर्ण केलं. पहिल्याच प्रयत्नात तो उत्तीर्णही झाला. आई-वडिलांचं स्वप्न साकार करत गावातला पहिला बीडीएस डॉक्टर होण्याचा मान त्यानं मिळवला.अभिषेक न यशाचं श्रेय आजी-आजोबा आई-वडील काका-काकू भाऊ-बहीण कुटुंबीयांसह गुरुजनांना दिलं आहे.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी खचून न जाता स्पर्धा परीक्षांमध्ये हिमतीनं पुढं जावं असं आवाहन त्यानं युवकांना केलं आहे.

# स्वानंद सार्वजनिक वाचनालयात छ.संभाजी महाराज बलिदान दिन व महाराजा सयाजीराव गायकवाड जयंती आणि यशवंतराव चव्हाण जयंती संपन्न



केज/प्रतिनिधीस्वानंद सार्वजानिक वाचनालय, आनंदगांव ता. केज जि. बीड येथे दिनांक ११ मार्च २०२५ रोजी छ.संभाजी महाराज बलिदान दिन व महाराजा सयाजीराव गायकवाड जयंती अत्यंत साधेपणाने साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, प्राचार्य डॉ. वसुदेव( बप्पा) गायकवाड हे होते.प्रमुख अतिथी म्हणून महेश गायकवाड, बाळासाहेब गायकवाड यांची उपस्थिती होती.सर्वप्रथम महेश गायकवाड व बाळासाहेब गायकवाड यांच्या हस्ते छ.संभाजी महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पन करून पुजन व वंदन करण्यात आले.दिनांक १२ मार्च २०२५ रोजी जेष्ठ स्वातंत्यसेनानी, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चवहाण यांची जयंती अतंत्य साधेपणाने साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी डॉ. वसुदेव( बप्पा) गायकवाड हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच रामराजे गायकवाड, बबन पुंड, रावसाहेब गायकवाड यांची उपस्थिती होती.सर्वप्रथम यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पुजन पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. रामराजे गायकवाड, बबन पुंड, रावसाहेब गायकवाड यांच्या हस्ते पुजन करण्यात आले.दोन्ही दिवशी वेगवेगळ्या कार्यक्रमाचे प्रस्ताविक, सुत्रसंचलन, आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद( भैय्या) गायकवाड यांनी केले.

# स्वच्छता ही माझी जबाबदारी समजून कृतीशील व्हावे-डॉ.हनुमंत सौदागर

केज/प्रतिनिधी

साने गुरुजी निवासी विद्यालय केज येथे गांधी तिर्थ स्वच्छता अभियान अंतर्गत स्वच्छतचे महत्त्व व स्वच्छता आरोग्या साठी किती आवश्यक आहे विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनासाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.या व्याख्यानाचे पुष्प गुंफताना प्राचार्य डॉ.हनुमंत सौदागर यांनी अस्वच्छता ही मानवनिर्मित घाण आहे तूज आहे तुजपाशी परी तु जागा चुकलाशी या उक्तीप्रमाणें स्वच्छतेची सुरुवात सर्वप्रथम स्वतहा पासून सुरू करायला पाहीजे भाषणे देऊन चालणार नाही या साठी आपण स्वतः कृती करायला पाहिजे.पृथ्वी निर्माण झाली त्यावेळेसच निसर्गातच सर्वांची निर्मिती झाली आहे. मानव,झाडे झुडपे,पशु पक्षी, प्राणी इत्यादीची निर्मिती झाली परंतु मनुष्याच्या गरजा जरा जास्तच वाढल्याने सुंदर स्वच्छ पृथ्वीवर माणसाने अस्वच्छता निर्माण करु लागला. हा देश माझा या देशाचे जरा से भान राहु द्या रे या प्रमाणे आपण स्वतः स्वच्छते विषयी जागरूक राहिले पाहिजे स्वच्छते मुळे रोगराई कमी प्रमाणात होते.अस्वच्छ असलेल्या भागात आजारपण व रोगराईचे प्रमाण आपण जास्त पाहतो या स्वच्छता ठेवा रोगराई मुक्त रहा हा संदेश आपण स्वतः पाळा व आपल्या परिसरातील नागरिक



यांना सुद्धा स्वच्छते विषयीचे महत्त्व सांगितले पाहिजे. तरच भारत देश महासत्ता होईल असे मत व्यक्त केले.या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साने गुरुजी निवासी प्रा.उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या डॉ. कविताताई कराड मॅडम या उपस्थित होते.

# शासनाच्या गायरान जमिनीची खरेदी-विक्री

माजलगाव (प्रतिनिधी)ः माजलगाव (प्रतिनिधी)ः माजलगाव शहर व परिसरात शेकडो एक्कर गायरान जमीन असून त्यापैकी काही जमीन मागासवर्गीय समाजाला उदरनिवर्हासाठी देण्यात आली होती. या जमिनीची अनधिकृत खरेदी विक्री करून करोडो रुपये कमावणाऱ्यावर मकोका कायद्यांतर्गत कार्यवाही करावी अशी मागणी बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी निवेदनाद्वारे केली आहे. उपविभागीय अधिकारी माजलगाव यांना दिलेल्या निवेदनात पोटभरे यांनी म्हटले आहे की, माजलगाव शहर आणि परिसरालगत मोक्याच्या ठिकाणी गटनंबर ०१, १८, ५९, २२६, २३३, २३७, २४०, २४९ मध्ये गायरान जमिनींच्या मोठ्या प्रमाणामध्ये खरेदी-विक्री झाली आहे. शासनाच्या गायरान जमिनी आहेत. त्या जमिनीची बाजारभाव किंमत करोडो रुपये होत असल्याने या जमिनीवर भूमाफियांची नजर जावून सदर जमिनी अत्यंत कवडीमोल किंमतीने अनाधिकृतपणे खरेदी करुन भूमाफियांनी गंभीर गुन्हा केलेला आहे. सदरील खरेदी केलेल्या जमिनी करोडो रुपये किंमतीने विक्री करुन भूमाफियांनी शासनाला व संबंधित जमिन कसणाऱ्यांना फसविण्याचे काम केले आहे. संबंधितांवर मकोका अंतर्गत गुन्हे दाखल करुन भूमाफियांविरुद्ध कठोर कार्यवाही करावी. सदरील मागणीची प्रत जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्यासह जिल्हाधिकारी बीड, यांना दिली आहे.

# राज्यस्तरीय आदिवासी धनगर साहित्य संमेलन लवकरच होणार जाहीर... प्राचार्य डॉ.अभिमन्यू टकले.

भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम. सहावे राज्यस्तरीय आदिवासी धनगर साहित्य संमेलन लवकरच होणार जाहीर असल्याचे प्राचार्य डॉ.अभिमन्यू टकले यांनी आमचे मुंबई प्रतिनिधी भारत कवितके यांना एका प्रसिद्ध पत्रकाद्वारे कळविले आहे.लोकमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची त्रीशताब्दी जयंती ३१ मे २०२५ रोजी असून तेथून पुढे वर्ष भर महाराष्ट्र शासनाकडून जयंती साजरी केली जाईल असे समजते, प्राचार्य डॉ.अभिमन्यू टकले पुढे म्हणाले की,‌ आजवर धनगर समाजाचे साहित्य संमेलन विदर्भात झालेले नाही, आदिवासी धनगर साहित्य संमेलन विदर्भात घेण्यासाठी संमेलनाचे सचीव ज्ञानेश्वर ढोमणे सर प्रयत्न शील आहेत, तर शिवाजी बंडगर सर करमाळा



येथे आदिवासी धनगर साहित्य संमेलन घेण्यासाठी उत्सुक आहेत,तर इंजिनिअर धुळाभाऊ शेंडगे यांनी आदिवासी धनगर साहित्य संमेलन बेंगलोर मध्ये घेतले तर सर्वोतोपरी मदत करीन असे सांगितले,दुसरे म्हणजे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्याने या बाबतीत साहित्य, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक क्षेत्रात जोरदार चर्चा सुरू आहे, आतापर्यंतचे सर्व साहित्य संमेलन स्वागताध्यक्ष, साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, संयोजक, सर्व क्षेत्रातील सहभागी यांचे बरोबर चर्चा करुन लवकरच सहावे साहित्य संमेलनाचे आयोजन महाराष्ट्र राज्यात करण्याचा ठाम निर्णय असून लवकरच याबाबत माहिती जाहीर करुन साहित्य प्रेमींना आनंदाची बातमी देऊ,‌या बाबत सोलापूर येथील ताराई हॉटेलमध्ये आदिवासी धनगर समाजातील गोविंद काळे, उज्वल कुमार माने, डॉ.मुरहरी केळे, डॉ.देविदास पोटे, डॉ.मुकुंद वलेकर, डॉ.वर्षा चौरे, लेखक रामभाऊ लांडे, कविता पोटे, अविनाश ठेंगील, विनायक काळदाते, आणि प्राचार्य डॉ.अभिमन्यू टकले आदी मान्यवर उपस्थित होते.

# संतोष देशमुख हत्याकांड्याची पुढील सुनावणी २६ मार्चला

केज/प्रतिनिधी:-संतोष देशमुख हत्याकांड्यातील पुढील सुनावणी ही 26 मार्च रोजी ठेवण्यात आली असल्याची माहिती मिळते आहे. या बाबतची माहिती अशी की संतोष देशमुख हत्याकांड प्रकरणी वाल्मीक कराड यांच्यासह इतर आरोपीवर दोषारोप-पत्र दाखल झाल्या नंतर आज दि. 12 मार्च रोजी केज येथील अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालयात न्यायाधिश भाजीपाले यांच्या न्यायालयात आज सुनावणी झाली. यावेळी आरोपीच्या वकिलांनी सांगितले की, आरोप पत्रात दाखल केलेले पुरावे व इलेक्ट्रॉनिक माध्यमातील सर्व साहित्य आरोपींचे घेतलेले जबाब याची अधिकृत प्रत मिळालेली नाही. म्हणून पुढील तारीख देण्यात यावी. तसेच यावेळी सरकारी वकील ड. बाबासाहेब कोल्हे यांनी आरोपींच्या वकिलांनी मागणी केलेली सर्व माहिती त्यांना रीतसर दिली जाईल असे सांगितले.त्यामुळे आता या प्रकरणाची सुनावणीची पुढील सुनावणीची तारीख ही 26 मार्च अशी आहे. आवादा कंपनी थोपटे हे फिर्यादी गैरहजर संतोष देशमुख यांची हत्या आणि खंडणी प्रकरणी शिवराज देशमुख आणि शिवाजी थोपटे यांच्या वेगवेगळ्या तक्रारी दाखल असल्याने न्यायालयात दोघांनाही पुकारण्यात आले असता शिवराज देशमुख हे हजर होते मात्र आवादा कंपनीचे शिवाजी थोपटे हे गैरहजर होते.आजचे कामकाज अद्याप पर्यंत आरोपींच्या वकिलांना मिळालेले नाहीत. तसेच यावेळी फिर्यादी शिवराज देशमुख आणि आवादा एनर्जींचे शिवाजी थोपटे यांनाही हजर होण्या संदर्भात पुकारण्यात आले असता शिवाजी थोपटे हे गैरहजर होते ते शिवराज देशमुख हजर होते. तसेच फरार कृष्णा आंधळे वगळता न्यायालयीन कोठडीत असलेल्या आरोपींना व्हिडिओ कॉफरांसिंग द्वारे हजर करण्यात आले होते.

# परमेश्वर सातपुतेंची उबाठा गटातून हकालपट्टी

बीड। प्रतिनिधी शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या जिल्हाप्रमुख पदावर बीडचे उल्हास गिराम पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. वादग्रस्त वक्तव्य करणारे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांची पक्षांकडून तातडीने हकालपट्टी करण्यात आली आहे. उद्धव ठाकरे सेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांचे साडू दादासाहेब खिंडकर यांच्यावर आरोप केले होते. पत्रकार परिषद घेऊन खिंडकर यांचे आका माजी आ.अमरसिंह पंडित असल्याचा आरोप केला होता.त्यानंतर पक्षाने याची गांभीर्याने दखल घेत त्यांची हकालपट्टी केली. त्यांच्या जागेवर उल्हास गिराम पाटील यांच्यावर गेवराई,आष्टी मतदार संघाची जबाबदारी देण्यात आली आहे.

# जागतिक महिला दिनानिमित्त विविध रंगी प्रदर्शन , चाट कॉर्नर , स्त्री दर्पण पुस्तक प्रकाशन

हडपसर रणरागिणी मार्केट या 300 पेक्षा हि जास्त मेंबर्स असलेल्या व्यावसायिक ग्रुप तर्फे हडपसर निर्मल टाऊनशिप येथे जागतिक महिलादिना निमित्त निर्मल टाउनशिप मधील महिलांसाठी रविवार दिनांक 9 मार्च 2025 रोजी भव्य महिलादिन महोत्सव तसेच प्रदर्शन आणि विक्री आयोजित करण्यात आली होती. ना नफा ना तोटा या तत्वावर या प्रदर्शना चे आयोजन करण्यात आले होते. हडपसर रणरागिणी मार्केट तसेच निर्मल च्या रणरागिणी या ग्रुप च्या अध्यक्षा सौ. मीनल राजेश हर्णे यांनीं या आगळ्या वेगळ्या संकल्पाला मूर्त रूपात आणले. या वर्षी महिला दिन महोत्सवाला हडपसर रणरागिणी मार्केट मधील महिला व्यावसायिकांच्या स्टॉल्स ची जोड देऊन व्यावसायिक प्रदर्शन तसेच विक्री च्या क्षेत्रात त्यांनी पदार्पण केले. त्यांना निर्मल टाउनशिप मधील रणरागिणींनी तशीच खंबीर साथ दिली. रविवारी सकाळी सर्वप्रथम प्रभावी साउंड हीलिंग थेरपी चे सेशन जेतवन बुद्ध विहाराच्या अध्यक्ष डॉ. प्रतिभा मनवर - पी एच डी, मेडिटेशन; यांनी निर्मल टाऊनशिप च्या रणरागिणी सौ. कांचन मुन यांच्या सहकार्याने निर्मल टाऊनशिप मधील महिलांसाठी घेतले. दुपारी गणेश वंदनेने या कार्यक्रमाची सुरुवात झाली, त्या नंतर निर्मल टाऊनशिप मधील महिलांनी, लहान मुलींनी आणि ज्येष्ठ नागरीक महिलांनी निरनिराळे मनोरंजनात्मक कार्यक्रम सादर केले त्यात सरस्वती वंदना, अभंग, गवळण, गाणी, नृत्य, महिला जागृती व प्रबोधन पर भाषण, निर्मल टाऊनशिप मधील प्राणी मित्र सीमा नायर यांचा सत्कार इत्यादी कार्यक्रम घेण्यात आले. तसेच स्त्री दर्पण या द्विभाषिक मासिकाच्या विशेषांकाचे प्रकाशन हडपसर मधील आपला माणूस म्हणून प्रसिद्ध, कार्यक्षम नगरसेवक माननीय श्री.आबा तुपे व सुप्रसिद्ध गझलकारा, कवयित्री कविता ताई काळेयांच्या हस्ते करण्यात आले. माननीय श्री. आबा तुपे यांच्या हस्ते फीत कापून हडपसर रणरागिणी मार्केट च्या व्यावसायिक प्रदर्शनाचे उदघाटन संपन्न झाले. आबांनी हया वेळी समस्त रणरागिणींच्या कार्याचे यावेळी कौतुक केले, तसेच मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. निर्मल च्या रणरागिणींची उपस्थिती या वेळी लक्षणीय होती. प्रदर्शनातील स्टॉल्स ना साधारण पाचशे व अधिक लोकांनी भेट दिली व खरेदी केली. प्रदर्शनात केक्स, देवपूजेसाठी लागणारे साहित्य, धूप, अत्तर, रांगोळ्या, मोत्यांचे दागिने, इमिटेशन ज्वेलरी, हेअर व इतर एक्सेसरी, खाद्य पदार्थ, मसाले, लोणचे, चटण्या, फराळाचे पदार्थ, हस्तकलेचे डेकोरेटिव्ह वस्तू, हस्तकला दागिने, निरनिराळ्या प्रकारचे डिझायनर कपडे इत्यादी स्टॉल्स लावण्यात आले होते. प्रदर्शनात मिळालेल्या चांगल्या प्रतिसादाने तसेच अतिशय चांगल्या प्रकारे नियोजन आणि सुविधा मिळण्याने, शिवाय झालेल्या भरपूर विक्री आणि नफ्याने समस्त स्टॉल धारक अतिशय समाधानी आणि आनंदी होते. कार्यक्रमानंतर त्यांनी तश्या प्रतिक्रिया आयोजकांना दिल्या. शिवाय यापुढील हडपसर रणरागिणी मार्केट च्या प्रदर्शनाला पुन्हा बोलावण्याची विनंती देखील केली. एकंदरीत हा महिलादिन महोत्सव फार आनंदात आणि उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या नियोजनासाठी अध्यक्ष सौ. मीनल हर्णे, सौ. वैष्णवी राठोड, सौ. कांचन मुन, सौ. मैथिली झाडगावकर, सौ. मेनका उमडेकर, सौ. सुनंदा माडगे, सौ. लीना मंकणी यांनी सहकार्य केले तसेच कार्यक्रमात सौ. मीनाक्षी क्षीरसागर, सौ. प्रतिभा पाठक, सौ. मनीषा शिंदे, निर्मल टाऊनशिप दत्तमंदिर कमिटी च्या सौ. सुभद्रा सोनावणे व समस्त महिला भजन ग्रुप, तबला वादक अथर्व माडगे, सौ. नीलम सिंग, सौ. संध्या कुहडि, सौ. अंजली सुभेदार, सौ. सुजाता नाणेकर,

# मारोती पांचाळ यांचा आदर्श पोलिस पाटील म्हणून गौरव

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड-लोहा : तालुक्यातील जोमेगाव येथील पोलिस पाटील मारोती पांचाळ यांची आदर्श पोलिस पाटील म्हणून निवड करण्यात आली असून पोलिस अधिक्षक अबिनाश कुमार यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला आहे. उस्माननगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एकमेव पोलिस पाटील पांचाळ यांची निवड करण्यात आली आहे.नांदेड येथील पोलिस मुख्यालयात नांदेड जिल्ह्यातील पोलिस पाटलांचा मेळावा ११-मार्च रोजी आयोजित करण्यात आला होता.पोलिस अधिक्षक अबिनाश कुमार यांनी जिल्ह्यातील सर्व पोलिस ठाण्याच्या प्रभारी यांना त्यांच्या हद्दीत उत्कृष्ट काम करणाऱ्या पोलिस पाटील यांचे नाव कळविण्याचे आदेश दिले होते. उस्माननगर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक चंद्रकांत पाटील यांनी त्यांच्या हद्दीतील सर्व पोलिस पाटील यांच्या कामाकाजाची पडताळणी केली.तसेच त्यांच्या अभिलेखेची तपासणी करुन आदर्श पोलिस पाटील म्हणून पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्याकडे जोमेगाव येथील पोलिस पाटील मारोती पांचाळ यांच्या नावांचा




प्रस्ताव पाठविला.नांदेड येथील पोलिस पाटील मेळाव्यात पोलिस अधिक्षक अबिनाश कुमार यांनी जोमेगाव येथील पोलिस पाटील मारोती पांचाळ यांचा आदर्श पोलिस पाटील म्हणून प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले आहे.

त्यांच्या निवडीबद्दल सरपंच श्रीमती कमलबाई संभाजी शिंदे,भास्करराव पाटील शिंदे, माजी सरपंच आदीनाथ पाटील शिंदे, माजी सरपंच पुरभाजी शेटे, संजय पाटील शिंदे,शिवराज पाटील शिंदे, माजी सरपंच कोंडिबा गव्हाणे,चेअमन दिंगबर पाटील शिंदे,आनंदराव शिंदे यांनी स्वागत केले आहे.

# हेडिंग-सोसायटीत महिला दिन उत्साहाने साजरा.



कल्याण --आजकाल जागतिक महिला दिन हा सगळीकडेच मोठ्या उत्साहात पार पडतो . कल्याण येथे अनेक सोसायटी मध्ये ही महिलांना सन्मान देण्यात येतो. खरोखर या गोष्टींचा महिलांना हेवा वाटतो. स्त्री म्हणजे घराबाहेर जाऊन नोकरी करणारी असो किंवा घर सांभाळून मुलांना योग्य शिक्षण देऊन स्वतःची जबाबदारी पार पाडणारी स्त्री असो.या सर्व महिलांना एकत्रित करून हा सोहळा अगदी आनंदाने साजरा केला जातो.

ज्येष्ठ नागरिक संघातील ज्योती लिखिते, तिलोत्तमा विचारे तसेच अनिता मटकरी या महिलांनी पुढाकार घेऊन हा कार्यक्रम अतिशय सुंदर रित्या साजरा केला.त्या निमित्ताने खूप दिवसांनी अशा ७०/८०महिला एकत्र येऊन गप्पांच्या ओघात रमल्या.त्यामुळे कार्यक्रम जरी छोटेखानी असला तरी महिलांनी आनंद भरभरून घेतला. निकीनगर को.हौ.सोसायटीमध्ये ही महिला दिनाच्या निमित्ताने हा उत्सव साजरा करण्यात आला . यावेळी महिलांना साठी संगीत खुर्ची ही ठेवण्यात आली होती. सर्व महिलांना गुलाबाचे पुष्प आणि मिठाई देऊन सन्मानित करण्यात आले.याप्रसंगी महिला आजकाल सुरक्षित आहेत का..?यावर साहित्यिक अनिता प्रविण कळसकर यांनी महिला सबलीकरण नावाची कविता सादर केली.तसेच आजचा महिला दिवस आपण साजरा करतो ,ते आपल्या हक्कासाठी लढा देणाऱ्या स्त्रियांना मानवंदना देण्यासाठी असे सांगितले .शिवाय महिला दिनाविषयी थोडक्यात माहिती ही दिली.असा हा आगळावेगळा कार्यक्रम प्रथमच सोसायटीत केल्याबद्दल ज्येष्ठ नागरिक संघाचे मनःपूर्वक आभार आणि धन्यवाद ही मानले. आजचा दिवस महिलांनी भरभरून एकमेकांची स्तुती कली.

## माजी सामाजिक न्याय मंत्री तथा राज्यसभेचे खासदार चंद्रकांत हंडोरे यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा



केजप्रतिनिधीः-भीमशक्ती सामाजिक संघटनेचे मराठवाडा संघटक चंद्रकांत खरात सर यांच्या मार्गदर्शनाखाली माजी सामाजिक न्याय मंत्री तथा राज्यसभेचे खासदार चंद्रकांत हंडोरे यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला आहे. राज्यसभेचे खासदार चंद्रकांत हंडोरे यांच्या वाढदिवसानिमित्त भीमशक्ती सामाजिक संघटना केज तालुक्याच्या वतीने विविध उपक्रम घेण्यात आले. उपजिल्हा रुग्णालय केज येथे रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले. भीमशक्ती सामाजिक संघटनेचे मराठवाडा संघटक प्रा. श्री.चंद्रकांत खरात सर यांच्या मार्गदर्शनाखाली केज तालुकाध्यक्ष अक्षय वाघमारे यांच्या पुढाकारातून सर्व कार्यकर्त्यांनी माजी सामाजिक न्याय मंत्री तथा राज्यसभेचे खासदार चंद्रकांत हंडोरे यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा केला. यावेळी भीम शक्ती सामाजिक संघटनेचे मराठवाडा संघटक चंद्रकांत खरात सर, केज तालुकाध्यक्ष अक्षय वाघमारे, उपाध्यक्ष अशोक सरवदे, शहर अध्यक्ष शिवकुमार हजारे, तालुका सचिव विजयकुमार शिंदे, माणिक माने, सुभाष शिंदे, सूर्यभान शिंदे, अमर सरवदे, तुकाराम चौरे यांच्यासह उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर नर्स व कर्मचारी आणि भीमशक्ती सामाजिक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# बीडमध्ये शिक्षकाने संपवले जीवन; फेसबुक पोस्ट लिहल्याने उडाली खळबळ, पोलीस तपास सुरु

राज्यात गेल्या काही महिन्यांपासून बीडमधील गुन्हेगारी आणि विविध घटना लक्षवेधी ठरत आहेत. मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घुण हत्येनंतर बीडसह राज्यभरात तीव्र संतापाची लाट पसरली. याप्रकरणी, सीआयडी पोलिसांनी दोषारोपपत्र दाखल केले असून आरोपींना अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी, आमदार धनंजय मुंडेंचा निकटवर्तीय वाल्मिक कराड हाच प्रमुख आरोपी, व घटनेचा मास्टरमाईंड असल्याचे पोलिसांनी आपल्या दोषारोपपत्रात लिहिले आहे. त्यामुळे, धनंजय मुंडेंच्या मंत्रिपदाचा राजीनामा घेण्यात आला असून अद्यापही अनेक नवे कारनामे समोर येत आहेत. वाल्मिक कराडनंतर बीडमधील खोक्याभाई व आमदार सुरेश धस यांचा कार्यकर्ता असलेल्या सतिश भोसलेला अटक करण्यात आली आहे. त्यासह जिल्ह्यात विविध गुन्हेगारीच्या घटना समोर येत आहेत. त्यातच, आज बीडमधील एका शिक्षकाने गळफास घेऊन आपले जीवन संपवल्याने शहरात खळबळ उडाली आहे.



बीडच्या स्वराज नगर भागात एका शिक्षकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याने सर्वत्र खळबळ उडाली आहे. या आत्महत्येचं कारण अद्याप समजू शकलेले नाही. मात्र, फेसबुक पोस्टवर केलेल्या सुसाईड नोटवरुन पोलीस



या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. बीड शहरातील स्वराज नगर भागात सकाळच्या सुमारास कृष्ण अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड बाहेर एका व्यक्तीने एसीच्या अँगलला दोरीच्या साहाय्याने गळफास घेतल्याचे समोर आले. धनंजय नागरगोजे असं या शिक्षकाचे नाव असून ते कोळगाव येथील कायम विनाअनुदानित आश्रम शाळेवर ते शिक्षक होते. या आश्रम शाळेतील नोकरीशी संबंधित कारणावरुन त्यांनी आत्महत्या केल्याची चर्चा सध्या सुरू असून याप्रकरणी पोलीस तपास करत आहेत. दरम्यान, कोळगाव येथील आश्रम शाळेसाठी २०१९ मध्ये राज्य सरकारने २० टक्के अनुदान घोषित केले होते. मात्र, त्याची अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे अनेक अडचणी आल्या, असे कारण सध्या सांगितले जात आहे. नागरगोजे यांनी काल फेसबुक पोस्ट करून आत्महत्या करत असल्याचं सांगितले होते. त्यात काही व्यक्तींची नावे देखील नोंदवले होते. आता, यावरूनच पोलीस या घटनेचा तपास करत आहे.

# बीडचा गांजा तस्कर कल्याणमध्ये पकडला १२ किलो ४३६ ग्राम वजनाचा गांजा जप्त

बीड। प्रतिनिधी कल्याणमध्ये गांजा तस्काराला सापळा रचत बेड्या ठोकल्या आहेत. आरोपी हा बीडचा असून त्यानं बीडहून गांजा कल्याणमध्ये विकायला आणले असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. हा गांजा कुणाला विकण्यासाठी आणला होता? गांजा तस्कराचं आणि बीडचं काही कनेक्शन आहे का? याचा तपास पोलीस करीत आहेत. आरोपीकडून पोलिसांनी १२ किलो ४३६ ग्राम वजनाचा गांजा जप्त केला आहे. शकील शेख असं गांजा तस्कराचं नाव आहे. शकीलने हा



गांजा बीडहून आणला होता. शकील बीडचा रहिवासी असून, त्या ठिकाणी तो शेती करत असल्याची माहिती पोलिसांनी दिली.कल्याण सहाय्यक पोलीस आयुक्तांचे पथक कल्याणमध्ये गस्त घालत होते. गस्त घालत असताना पोलीस हवालदार प्रल्हाद चौधरी यांना बाजारपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत रेतीबंदर परिसरात एक व्यक्ती गांजा विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानंतर पोलीस निरीक्षक बाळासाहेब दुकळे, पोलीस अधिकारी प्रशांत आंधळे यांच्यासह बाजारपेठ पोलीस ठाण्याच्या पथकाने त्या परिसरात सापळा रचला. गांजा विक्रीसाठी आरोपी शकील शेख त्या ठिकाणी पोहोचला. तो संशयितरित्या फिरत असल्याचं पोलिसांना आढळलं. पोलिसांनी त्याची झडती घेतली असता, त्याच्याकडून १२ किलो ४३६ ग्राम वजनाचा गांजा आढळून आला. त्याला ताब्यात घेऊन पोलिसांनी त्याची चौकशी केली. त्यावेळी आरोपी बीडहून आल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत

## उमरा येथे अखंड हरिनाम सप्ताहाला सुरुवात

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी उमरा येथे ह.भ.प.वै.परमपूज्य संभाजी मामा महाराज मारतळेकर व ह.भ.प.परमपूज्य वै.धर्मभूषण वटेमोड महाराज सिद्धतीर्थ धाम हाळदा यांच्या कृपाशीर्वादाने अखंड हरिनाम सप्ताह व गाथा पारायण सोहळा श्री संत तुकाराम महाराज बीज निमित्त दि.१६- मार्च २०२५ रोज रविवार ते दि.२३-मार्च २०२५ रोज रविवार पर्यंत आयोजित केला आहे.दरवर्षी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते,हे ५३ वे वर्षे आहे.या सप्ताहात मराठवाड्यायील नामवंत कीर्तनकरांचे हरी कीर्तन होणार असून,सदर कीर्तन सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रम पहाटे ४ ते ६ काकडा आरती काकडा भजन




सकाळी ७ ते ९ ज्ञानेश्वरी पारायण दुपारी १० ते १२ गाथा भजन सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ रात्री ९ ते ११ हरीकिर्तन व नंतर जागर होईल.या वेळात सर्व कार्यक्रम होणार आहेत.साठी उमरा परिसरातील भावीक भक्तांनी उपस्थित राहून हरिनाम कीर्तनाचा व महाप्रदाचा लाभ घेण्याचे आवाहन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

## बोगस प्रवेश रोखण्यात शिक्षण विभाग अपयशी

खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेत सोडतीद्वारे प्रवेश जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची मुदत संपुष्टात आली. त्यानुसार, सोमवारी रात्रीपर्यंत जिल्ह्यात १ हजार ५७८ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. आता उर्वरित जागांवर प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना संधी दिली जाणार आहे. अशी माहिती शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी दिली आहे. राज्याच्या प्राथमिक शिक्षण संचालनालयातर्फे आरटीई प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येत आहे. यंदा जिल्ह्यात २१४ शाळांमध्ये २ हजार २३५ जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. त्यासाठी ५ हजार ७८१ अर्ज आले होते. प्रवेशासाठी काढलेल्या सोडतीद्वारे २ हजार १८३ विद्यार्थ्यांना प्रवेश निश्चित झाले होते. त्यानंतर प्रवेशपात्र विद्यार्थ्यांसाठी प्रवेशफेरी सुरू करण्यात आली. मात्र, त्याला फारसा प्रतिसाद न मिळाल्याने १० मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. या मुदतीत १ हजार ५७८ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला आहेत. आता उर्वरित जागांवर प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी

# सतिश भोसले उर्फ खोक्याला प्रयागराजमध्ये पकडले

बीड। प्रतिनिधीः-बीड जिल्ह्यातील मारहाणीच्या गुन्ह्यांमधील फरार असलेला आरोपी सतीश भोसले उर्फ खोक्या भाई याला बुधवारी सकाळी उत्तर प्रदेशच्या प्रयागराज येथे बेड्या ठोकण्यात आल्या. बीड पोलीस आणि उत्तर प्रदेश पोलिसांच्या संयुक्त पथकाने ही कारवाई केली. सतीश भोसले उर्फ खोक्या भाई प्रयागराज विमानतळावरुन पळण्याच्या तयारीत होता. तेव्हा पोलिसांनी खोक्या भाईच्या मुसक्या आवळल्या. काही दिवसांपूर्वी प्रयागराजमध्ये कुंभमेळा भरला होता. कुंभमेळ्यात प्रयागातील संगमावर शाही स्नान करण्यासाठी कोट्यवधी भाविक प्रयागराजमध्ये आले होते. त्याच प्रयागराजमध्ये पोलिसांनी खोक्या भाईला बेड्या ठोकल्या.प्राथमिक माहितीनुसार, सतीश भोसले उर्फ खोक्या भाई सुरुवातीला बीड जिल्ह्यातच फिरत होता. मध्यंतरी त्याने एका मराठी वृत्तवाहिनीला सविस्तरपणे मुलाखत दिली होती. खोक्या भाई प्रसारमाध्यमांना मुलाखत देतो पण पोलिसांना त्याचा ठावठिकाणा लागत नाही, यावरुन बीड पोलिसांची कार्यक्षमता आणि विश्वासर्हेतवर प्रश्न उपस्थित झाले होते. त्यानंतर सतीश भोसले याच्या तपासाला वेग आला होता. महाराष्ट्रात आपल्याला असलेला धोका वाढला आहे, आपण पकडले जाऊ शकते, हे खोक्याच्या लक्षात आले. त्यामुळे खोक्याने बस पकडून तातडीने प्रयागराज गाठले. इतक्या दूर




आपल्याला कोणीही पकडणार नाही, याची खोक्या भाईला खात्री असावी. तो प्रयागराजमधूनही निघण्याच्या तयारीत होता. त्यावेळी पोलिसांनी प्रयागराज विमानतळावर सतीश भोसले याला अटक केली.खोक्या भाई गेल्या अनेक दिवसांपासून पोलिसांना गुंगारा देत होता. बीड पोलिसांनी त्याला शोधण्यासाठी दोन पथके तैनात केली होती. मात्र, दिवसरात्र मेहनत घेऊनही खोक्या भाई पोलिसांना सापडत नव्हता. अखेर खोक्या वापरत असलेल्या मोबाईल फोनचे लोकेशन पोलिसांना मिळाले आणि तो अडकला.खोक्या भाईला पोलिसांनी पकडले असले तरी यामध्ये बीड पोलिसांपेक्षा उत्तर प्रदेशच्या पोलिसांचे योगदान अधिक असल्याची चर्चा रंगली आहे. खोक्याला सकाळी प्रयागराज पोलिसांच्या ताब्यात ठेवण्यात आले होते.

# तर न्यायाधीश त्यांच्यासोबत होळी खेळलेच नसते; दमानियांच्या ट्विटवर धनंजय देशमुखांची प्रतिक्रिया





बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपींना अटक झाली आहे, सीआडीकडून या प्रकरणात आरोपपत्र देखील दाखल करण्यात आलं आहे. या प्रकरणातील दोषी पोलीस अधिका-यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आलं आहे. मात्र या प्रकरणात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी मोठा दावा केला आहे. त्यांनी काही फोटो ट्विट करत सुनावणी करणा-या न्यायाधीशांसोबत सक्तीच्या रजेवर पाठवलेल्या पोलीस अधिका-यांनी होळी साजरी केल्याचे म्हटले आहे. या फोटो आणि व्हिडिओची ठीफ पुष्टी करत नाही. दरम्यान आता यावर संतोष देशमुख यांचे बंधु धनंजय देशमुख यांनी प्रतिक्रिया दिली आहे. माझ्या भावाच्या पाठीवर पडलेले रक्ताचे काळे निळे डाग या लोकांनी पाहीले असते तर, या प्रकरणातील सक्तीच्या रजेवर असलेले पोलीस अधिकारी न्यायाधिशांबरोबर होळी खेळले नसते, या लोकांची होळी बघून मला त्रास झाला हे अत्यंत चुकीचे आहे. असं धनंजय देशमुख यांनी म्हटलं आहे. दरम्यान या प्रकरणातील एक आरोपी कृष्णा आंधळे अजूनही फरार आहे. पोलिसांकडून त्याचा शोध सुरू आहे. मात्र त्याला पकडण्यात अद्यापही यश आलेलं नाही. यावर देखील धनंजय देशमुख यांनी प्रतिक्रिया दिली आहे. फरार असलेला आरोपी कृष्णा आंधळे सापडल्यानंतर या प्रकरणातील अनेक बाबी समोर येणार आहेत. आरोपी जर लवकर नाही सापडला तर मी काहीतरी वेगळा निर्णय घेणार आहे. फरार आरोपीकडील माहिती पुरावे त्यानी नष्ट केले तर त्याला जिम्मेदार कोण असणार? असा प्रश्नही यावेळी धनंजय देशमुख यांनी उपस्थित केला आहे.

### काय आहे अंजली दमानियांचा दावा?

अंजली दमानिया यांनी ट्विट करत असा दावा केला होता की, केजला होळीचा कार्यक्रम असताना तिथे राजेश पाटील जे एक निलंबित अधिकारी आहेत आणि दुसरे प्रशांत महाजन हे दोन्ही अधिकारी आले आहेत. ते सत्र न्यायालयाच्या न्यायाधीशांसोबत होळी खेळताना दिसतात. हे बघितल्यावर मला अतिशय धक्का बसला.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादकः राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com